# ३. भारतापुढील अंतर्गत आव्हाने

## १. थोडक्यात उत्तरे लिहा.

### (१) 'आनंदपूर साहिब' या ठरावात अकाली दलाने कोणत्या मागण्या केल्या?

**उत्तर:** १९७३ मध्ये अकाली दलाने 'आनंदपूर साहिब' हा ठराव मंजूर करून केंद्र शासनाकडे पुढील मागण्या केल्या:
(१) चंदीगढ पंजाबला दयावे व इतर राज्यांतील पंजाबी भाषिक प्रांत पंजाबमध्ये समाविष्ट करावेत.
(२) पंजाबचे सैन्यामधील संख्याप्रमाण वाढवावे.
(३) पंजाब राज्यास अधिक स्वायत्तता दयावी.

### (२) जमातवाद नष्ट करण्यासाठी कार्य केले याहिजे?

**उत्तर:** जमातवाद नष्ट करण्यासाठी:
(१) भिन्नधर्मीय लोकांत आपण मिसळले पाहिजे.
(२) परस्परांच्या सण-उत्सवांत सहभागी झाले पाहिजे.
(३) एकमेकांच्या चालीरिती, सद्विचार एकमेकांनी स्वीकारले पाहिजेत.
(४) परस्परांबद्दल आदरभाव बाळगला पाहिजे.
(५) एकमेकांच्या सामाजिक वा आर्थिक प्रश्नांकडे तर्कशुद्ध पद्धतीने पाहता आले पाहिजे.
(६) त्यासाठी आपल्या धर्माचा अतिरेकी अभिमान सोडायला हवा.

### (३) प्रदेशवाद केव्हा बळावतो?

**उत्तर:** (१) आपल्या प्रदेशाविषयी अवाजवी अभिमान बाळगण्यातून प्रदेशवाद बळावतो.
(२) माझा प्रांतच श्रेष्ठ मानण्याच्या वृत्तीतून प्रांताभिमान निर्माण होतो.
(३) आपल्या प्रदेशाविषयी वाटणाऱ्या आत्मीयतेला प्रांताभिमानामुळे विकृत स्वरूप प्राप्त होते; तेव्हा प्रदेशवाद बळावतो.
(४) विकासातील असमतोलातून प्रदेशवाद वाढीस लागतो.
(५) प्रादेशिक अस्मिता, स्थानिक परंपरा, संस्कृती यांच्या अनाठायी गौरवातूनही प्रदेशवाद बळावतो.
(६) दारिद्य, बेरोजगारी, मागासलेपण अशा समस्यांतूनही प्रदेशवाद वाढीस लागतो.

## २. पुढील संकल्पना तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

### (१) जमातवाद

**उत्तर:** (१) 'जमातवाद' म्हणजे आपलाच धर्म श्रेष्ठ मानणे व इतर धर्मांना कमी लेखणे होय.
(२) जेव्हा आपल्या धर्माचा अभिमान बाळगण्याचा अतिरेक होतो; तेव्हा त्याचे दुरभिमानात रूपांतर होते.
(३) समाजात असे स्वत:ला श्रेष्ठ मानणारे धार्मिक गट निर्माण होऊन ते इतर धर्मांना तुच्छ लेखतात. त्यातूनच जमातवाद निर्माण होतो.
(४) थोडक्यात, संकुचित धार्मिक अभिमानातून जमातवाद निर्माण होतो.

**(२) प्रदेशवाद.**

**उत्तर:** (१) आपल्या प्रदेशाविषयी अतिअभिमान आणि अन्य प्रदेशांविषयी कनिष्ठतेची भावना असणे, म्हणजे 'प्रदेशवाद' होय.
(२) अवाजवी प्रांताभिमानामुळे प्रदेशाविषयीच्या आत्मीयतेला विकृत स्वरूप प्राप्त होते.
(३) आपल्या प्रदेशाविषयी अतिरेकी आत्मीयता अनिष्ट प्रदेशवाद निर्माण करते.
(४) त्यामुळे राष्ट्राच्या एकात्मतेला तडा जातो.

**३. का ते लिहा.**

**(१) 'ऑपरेशन ब्लू स्टार' करावे लागले.**

**उत्तर:** (१) १९८० च्या दरम्यान पंजाबमध्ये 'स्वतंत्र खलिस्तान' चळवळीला सुरुवात झाली व पुढे ती तीव्र बनली. जर्नेलसिंग भिंद्रानवाले याने सशस्त्र अनुयायी गोळा करून दहशतवादी कारवायांना सुरुवात केली.
(२) त्याने 'अकाल तख्त' या धार्मिक स्थळाचा आश्रय घेतला. त्याच्या अनुयायांनी सुवर्णमंदिराचा परिसर ताब्यात घेऊन अतिरेकी कारवाया केल्या. सुवर्णमंदिराला किल्ल्याचे स्वरूप आले व शांतता धोक्यात आली.
(३) सुवर्णमंदिरातून या दहशतवादयांना बाहेर काढून पंजाबात शांतता प्रस्थापित करण्यासाठी केंद्र सरकारला 'ऑपरेशन ब्लू स्टार करावे लागले.

**(२) जमातवादाचा सर्वशक्तीनिशी मुकाबला करणे आवश्यक आहे.**

**उत्तर:** (१) संकुचित धार्मिक अभिमानातून जमातवाद निर्माण होतो. या दुरभिमानातून भिन्न धर्मीयांचा एकमेकांवरील विश्वास उडतो. हा विश्वास उडाला की सामाजिक ऐक्याला तडा जातो. समाजातील शांतता धोक्यात येते.
(२) धर्माच्या नावाने दंगली होऊन मोठ्या प्रमाणात मालमत्ता आणि जीवित यांची हानी होते.
(३) व्यापक राष्ट्रहिताचा विसर पडून फुटीरता निर्माण होते. या दुहीचा आणि अशांततेचा फायदा शत्रुराष्ट्रे घेतात; म्हणून जमातवादाचा सर्व शक्तीनिशी मुकाबला करणे आवश्यक आहे.

**४. पुढील संक्षिप्त रूपाचे पूर्ण रूप लिहा.**

**(१) MNF:** <u>मिझो नॅशनल फ्रंट.</u>
**(२) NNC:** <u>नागा नॅशनल कौन्सिल.</u>
**(३) PLGA:** <u>पीपल्स लिबरेशन गुरिला आर्मी.</u>